पक्षवेध- श्री. वि. रा. जाधव - स.का.आ.

असंघटित व संघटित क्षेत्रात कामगार कायद्याच्या अंमलबजावणीचे कामात गुणात्मक व संख्यात्मक सुधारणा करणेबाबत.

परिपत्रक क्र.काआ/अंमलबजावणी/२०१०/कार्या-१९.
कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
"कामगार भवन", ई-ब्लॉक, सी-२०,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : 06 NOV 2012

-: परिपत्रक :-

विषय : विविध कामगार कायद्याच्या निरीक्षण भेटी उद्दिष्टाबाबत.

वाचा : परिपत्रक क्र.काआ/अंमलबजावणी/२०१०/कार्या-१९, दिनांक १३.१०.२०१०.
वाचा : परिपत्रक क्र.काआ/ अंमलबजावणी/२०१०/कार्या-१९, दिनांक २२.१०.२०१२.

कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.१०.२०१२ रोजी कामकाजाचा आढावा घेण्यासंदर्भात झालेल्या विभागीय प्रमुखांच्या बैठकीमध्ये विविध कामगार कायद्यांच्या अनुषंगाने निरीक्षण भेटीबाबत सरकारी कामगार अधिकारी, किमान वेतन निरीक्षक व दुकाने निरीक्षक यांच्या आस्थापना भेटींचे मासिक लक्ष्यबाबत उपरोक्त दिनांक १३.१०.२०१० चे तसेच दि. २२.१०.२०१२ च्या परिपत्रकांच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली असता, त्यामध्ये प्रामुख्याने यापूर्वी निरीक्षणांचे उद्दिष्ट हे विविध कामगार अधिनियमांतर्गत केलेले निरीक्षणे होते. तथापि, आता आस्थापनानिहाय उद्दिष्ट आहे व एका आस्थापनांमध्ये लागू असलेल्या सर्व कामगार अधिनियमांची निरीक्षणे करावयाची असल्याने सरासरी एका आस्थापनेमध्ये ०३ निरीक्षणे धरल्यास २२५ निरीक्षण शेरे प्रतीमहा करण्याचे उद्दिष्ट व्यवहार्य नसून, आयुक्तालयातील इतर कामकाजाचा आढावा पहाता ते जास्त आहे व ते पूर्ण करता येण्यासारखे नाही, ही बाब विभागीय प्रमुखांनी कामगार आयुक्त यांचे निदर्शनास आणून दिली. अशा परिस्थितीमध्ये त्यामध्ये व्यवहार्य व शक्य होईल असे लक्ष्य ठेवल्यास कामकाजात निरीक्षणाच्या संख्येपेक्षा निरीक्षण दर्जामध्ये सकारात्मक व अंमलबजावणीस पूरक अशी निश्चित भरीव प्रगती होईल, या उद्देशाने सदर दिनांक २२.१०.२०१२ च्या परिपत्रकामध्ये, दि. ३०.१०.२०१२ रोजीच्या बैठकीत विभाग प्रमुखांनी एकमताने घेतलेल्या निर्णयानुसार, पुढीलप्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहेत.

अ) सरकारी कामगार अधिकारी :-

१. अ) पूर्णवेळ अंमलबजावणीचे काम करणारे मुख्य कार्यालयातील सरकारी कामगार अधिकारी - २५ आस्थापना व एकूण ७५ निरीक्षणे

ब) पूर्णवेळ अंमलबजावणीचे काम करणारे मुख्य कार्यालय सोडून इतर कार्यालयातील सरकारी कामगार अधिकारी - २५ आस्थापना व एकूण ७५ निरीक्षणे

२. सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय असलेल्या व एकमेव सरकारी कामगार अधिकारी असलेल्या जिल्हा कार्यालयासाठी - १५ आस्थापना व एकूण ४५ निरीक्षणे

C:\Users\sjeuie\P.C. 11\Sangeeta\Kadam-S.T.C-11.doc

३. सहाय्यक कामगार आयुक्त जिल्हा कार्यालयात एकापेक्षा अधिक सरकारी कामगार अधिकारी असल्यास - २५ आस्थापना व एकूण ७५ निरीक्षणे

४. माथाडी मंडळ अथवा सुरक्षा रक्षक मंडळाचा अतिरिक्त कार्यभार असलेले सरकारी कामगार अधिकारी - १५ आस्थापना व एकूण ४५ निरीक्षणे

५. सरकारी कामगार अधिकारी हे कार्यालय प्रमुख असलेल्या कार्यालयातील सरकारी कामगार अधिकारी - १५ आस्थापना व एकूण ४५ निरीक्षणे

**ब) दुकाने निरीक्षक –** १२५ निरीक्षणे व ६० भेटी त्यामध्ये १०० निरीक्षणे दुकाने व संस्था अधिमांतर्गत + २५ इतर अधि. जसे किमान वेतन, वेतन प्रदान अधि.,बाल कामगार इत्यादी.

**क) किमान वेतन निरीक्षक** -शेती-१०० निरीक्षणे व अतिरिक्त कार्यभार असल्यास शेती-५० निरीक्षणे

विविध कामगार कायद्यांतर्गत सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडून करण्यात येणाऱ्या निरीक्षणाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण रहावे आणि कामगार कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये भरीव सुधारणा व्हावी, यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त, कामगार उप आयुक्त यांनीही आस्थापनांना पर्यवेक्षीय भेटी देणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने पर्यवेक्षीय भेटीसंदर्भात यापूर्वी काढण्यात आलेल्या कार्यालयीन आदेशाचे व परिपत्रकाचे अधिक्रमण करण्यात येऊन त्यांना दरमहा १० आस्थापनांना कामगार कायद्यांतर्गत पर्यवेक्षीय भेटी देण्याचे उद्दिष्ट ठरवून देण्यात येत आहे. वरील आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी आणि कार्यालयात सादर करावयाचे विविध अहवाल वेळेवर सादर केले जातील याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

दिनांक १३.१०.२०१० च्या परिपत्रकातील उक्त निर्देश आहे तसेच ठेवण्यात येवून त्यामध्ये कोणताही बदल करण्यात येत नाही. तसेच सदर उद्दिष्टांबाबत दि.३०.१०.२०१२ रोजी संपन्न झालेल्या कामकाज आढावा बैठकीत सविस्तर चर्चा झाल्याने सुधारित उद्दिष्टे निश्चित केली असून दि. १.४.२०१२ पासून ती लागू होतील.

कामगार आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

१. अपर कामगार आयुक्त,को.वि.,मुंबई/पुणे/नागपूर.
२. कामगार उप आयुक्त, औरंगाबाद / नाशिक.
३. कामगार उप आयुक्त, मुंबई (सर्व) ग्रा. वि.

यांना सूचना करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सहाय्यक कामगार आयुक्त, सरकारी कामगार अधिकारी, किमान वेतन निरीक्षक, दुकाने निरीक्षक यांना लिखित स्वरुपात कळवावे व त्यांचेकडून सदरहू परिपत्रकातील सूचनांची अंमलबजावणी करुन घ्यावी.

**प्रत माहितीसाठी :**

मा.सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

C:\Users\sjeuie\P.C. 11\Sangeeta\Kadam-S.T.C-11.doc